

॥श्री॥

# मन

मनाचा ठाव कधी कधी लागत नाही,
कारण मनात काय चाललय कळत नाही
मनावर तसे बंधन कुठलेच नसते,
त्याभोवती कुंपण आपणच घातलेले असते.
मनाचे कायं ते तर सैरभैर धावतच असते,
लगाम त्याला कधी द्यायचा हे आपल्या हातात असते.
मन तसे सगळ्यांचे एकसारखेच असते,
पण प्रत्येकाच्या मनात डोकावत येत नसते.
कायमच आपण मनाला येईल तसे वागत नाही,
लोकांना काय वाटेल म्हणून व्यक्त होत नाही.
मन तसे खूप मोठे असते,
काही पण त्यात सामाऊन घेता येते.
कधीतरी मन मोठे करून बघा,
आनंदाने ओंजळ भरते की नाही बघा.
असे म्हणतात शेवट माणूस सगळे इथेच सोडून जातो,
पण खर तर मनात खूप साऱ्या क्षणांची शिदोरी घेऊन जातो.

आरती ज. भगत
कोथरूड, पुणे